# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

## प्रेस नोट दिनांक :-२८/१०/२०२२

---

## ऑनलाईन फसवणुकीतील २ लाख १५ हजार रुपये फिर्यादीचे खात्यामध्ये परत सायबर सेल, यवतमाळ यांची कामगिरी..

दिनांक-२३/१०/२०२२ रोजी डोगंरखर्डा ता. कळंब येथील पंकज लक्ष्मण पिंपराडे यांना फसवणुकीचा कॉल आला की, तुम्ही क्रेडीट कार्ड वापरले नाही त्यामुळे तुमचे बँक खात्यामधुन पैसे कपात होतील, त्यांनी सुरवातीला या कॉलला प्रतिसाद दिला नाही परंतु कॉलवरील व्यक्तीने पुन्हा कॉल करुन संभाषण करताना बोलण्याचे ओघात फिर्यादी यांना Play store वरुन Any Desk हे application डाउनलोड करण्यास सांगुन त्याद्वारे फिर्यादीचे मोबाईलचा एक्सेस घेतला व क्रेडीट कार्डचे डिटेल्ससह ओटीपी घेवुन फिर्यादी यांची एकुण २,५४,२५० रुपयाची फसवणुक केली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोस्टे कळंब येथे अपराध क्रं. ८२०/२०२२ कलम ४२० भा.दं.वि सह क. ६६ ड आयटी एक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

फिर्यादी पंकज लक्ष्मण पिंपराडे यांचेसोबत ऑनलाईन झालेल्या फसवणुकीबाबत पोस्टे कळंब यांनी तात्काळ सायबर सेल यवतमाळ येथे संपर्क करुन सविस्तर माहीती दिली. सायबर सेल यवतमाळ यांनी क्षणाचाही विलंब न लावता तात्काळ दखल घेतली व आरोपीने फिर्यादी यांचे क्रेडीट कार्डचा वापर करुन ज्या ठिकाणी Transaction केले होते, त्या संबधित नोडल अधिकारी यांना ईमेलद्वारे संपर्क करुन पैसे परत आणण्याकरिता कार्यवाही सुरु केल्याने फिर्यादी यांचे २ लाख १५ हजार रुपये परत आणण्यात यश आले आहे. ऑनलाईन फसवणुक करणारे आरोपींबाबत पुढील तपास सुरु आहे. जिल्हा पोलीस दलाची धुरा सांभाळणारे पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी सायबर क्राईम यावर विशेष भर देवुन गुन्हे उघडकीस आणन्याकरिता विशेष प्रयत्न करणार असल्याचे सुतोवाच केले होते. सायबर क्राईम बाबतीत एक चांगली कामगीरी झाल्याने पोलीस अधीक्षक यांनी सायबर सेल येथील अधिकारी व अमंलदार यांचे अभिनंदन करुन कौतुक केले आहे.

सदरची कार्यवाही डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, डॉ. के. ए. धरणे अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अजित राठोड ठाणेदार कळंब, सपोनि विकास मुंढे, पोलीस शिपाई अजय निंबोळकर ब.नं.९८०, मपोशी रोशनी जोगळेकर ब.नं.१९३०, प्रगती कांबळे ब.नं.१७७७, पोशी अभिनव ब.नं.११६१ सर्व सायबर सेल यवतमाळ यांनी पार पाडली.

याद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपल्याला लॉटरी, जॉब ऑफर, ईलेक्ट्रीक बिल, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन लोन किंवा ५ जी अपडेट ईत्यादीबाबत मोबाईल नंबरवरुन कॉल आल्यास अशा प्रकारच्या कोणत्याही अनोळखी कॉलला प्रतिसाद देवु नका किंवा कोणत्याही लिंकवर खात्री झाल्याशिवाय क्लीक करु नका. दुर्देवाने आपल्यासोबत सायबर क्राईमचा प्रकार घडल्यास तात्काळ १९३० या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा किंवा सायबर सेल, यवतमाळ व संबधित पोस्टे येथे संपर्क साधावा.

Gulhane

S. R. Gulhane
P.R.O. Yavatmal.